# सेवा करातील काही महत्त्वपूर्ण बदल

- ॲड. गौरी नातु
फोन: ०२०-२४४६३२६४

केंद्रीय स्तरांवरील करांमध्ये सध्या 'सेवाकर' भरपूर चर्चेत आहे, ह्याचे कारण म्हणजे 'निगेटिव्ह लीस्ट' आणि 'रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम'.

फायनान्स ॲक्ट,१९९४ मधील कलम ६८(१) प्रमाणे सेवा पुरवणारी म्हणजेच सेवा देणारी व्यक्ती ही सेवाकर भरण्यास जबाबदार असते. परंतु त्याचखालील कलम ६८(२) प्रमाणे काही सेवांच्या बाबतीत सेवाकर भरण्याची जबाबदारी ही सेवा घेणाऱ्या व्यक्तीची देखील असू शकते.

फायनान्स ॲक्ट, २०१२ नुसार ह्या कलम ६८(२) मध्ये १/७/२०१२ पासून काही महत्वपूर्ण बदल करण्यात आले आणि ह्या बदलांनुसार काही सेवांच्या बाबतीत आता एकाच सेवेसाठी सेवा पुरविणारी व्यक्ती व सेवा घेणारी व्यक्ती हे दोघेही सेवाकर भरण्यास जबाबदार आहे. ह्यालाच 'पार्शियल रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम' असे म्हटले आहे.

अधिसूचना क्रमांक ३०/२०१२ दिनांक २०/६/२०१२ मध्ये नमूद केलेल्या सेवांपैकी चार सेवांच्या बाबतीमध्ये सेवाकर भरण्याची जबाबदारी ही सेवा पुरविणारा व सेवा घेणारा ह्या दोघांचीही आहे. ह्याच अधिसूचनेमध्ये ही जबाबदारी किती प्रमाणात आहे, हे देखील कोष्टक मांडून दाखविण्यात आले आहे.

हे नवीन नियम, तरतुदी त्यानुसार ठेवाव्या लागणाऱ्या नवीन नोंदी, भरावयाची विवरणपत्रे ह्या सर्व गोष्टी सेवा घेणाऱ्याच्या हळूहळू अंगवळणी पडत असल्या तरी गोंधळाची स्थिती मात्र अजूनही आहेच.

आजच्या लेखांमध्ये आपण ही 'रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम' ची पध्द्त आणि सेनव्हॅट क्रेडिट ह्या विषयी पाहूया.

सेनव्हॅट क्रेडिट नियमावलीतील नियमाप्रमाणे सेवा घेणारी व्यक्ती ही अंतर्भुत सेवांवरील (इनपुट सर्व्हिस) सेवाकराचे क्रेडिट घेऊ शकते. येथे अधिसूचना क्रमांक ३०/२०१२ प्रमाणे काही सेवांच्या बाबतीत सेवा घेणारी व्यक्ती ही सेवाकर भरण्यास जबाबदारी असली तरीही जर ती सेवा त्या



व्यक्तीकरता अंतर्भुत सेवा असेल तर सेवा घेणारी व्यक्ती ही त्या सेवेवरील सेवाकराचे क्रेडिट देखील घेऊ शकते. असे जरी असेल तरी 'पार्शियल रिव्हर्स चार्ज' खाली मोडणाऱ्या दोन सेवा मात्र ह्याला अपवाद आहेत. त्या म्हणजे –

- मोटार गाड्या भाड्याने देण्याची सेवा आणि
- करारतत्वावर कामे करून देण्याची सेवा

ह्याचे मुख्य कारण म्हणजे सेनव्हॅट क्रेडिट नियमावलीतील नियम २(१) मध्ये दिलेल्या अंतर्भूत सेवेच्या व्याख्येमध्ये ह्या दोन सेवांचा समावेश होत नाही आणि म्हणूनच वर उल्लेखलेल्या दोन सेवांच्या बाबतीत सेवा घेणारी व्यक्ती ही 'पार्शियल रिव्हर्स चार्ज'नुसार जरी सेवाकर भरण्यास जबाबदार असली तरीही ह्या सेवांवर भरलेल्या सेवाकराचे क्रेडिट मात्र घेऊ शकत नाही.

इतर दोन सेवांच्या बाबतीत सेवा घेणाऱ्याने त्याने भरलेल्या रकमेचे क्रेडिट घेताना काही महत्त्वपूर्ण गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. येथे सेनव्हॅट क्रेडिट नियमावलीतील नियम ४(७) पाहणे आवश्यक आहे. ह्या नियमाप्रमाणे सेनव्हॅट क्रेडिट घेण्याअगोदर सेवा घेणाऱ्या व्यक्तीने सेवा पुरविणाऱ्यास त्या सेवेचा संपूर्ण मोबदला (त्याने लावलेल्या सेवाकराच्या रकमेसह) देणे आवश्यक आहे. तसेच सेवा घेणाऱ्या व्यक्तीने तो जबाबदार असलेली सेवाकराची रक्कम सरकारी तिजोरीत जमा केली पाहिजे. ह्या वर उल्लेख केलेल्या दोन अटींची पूर्तता केल्याशिवाय सेवा घेणारी व्यक्ती ही तिच्या अंतर्भुत सेवेवरील सेवाकराच्या रकमेचे क्रेडिट घेऊ शकत नाही.

येथे सर्वात महत्त्वाचे म्हणजे सेनव्हॅट क्रेडिट नियमावली, २००४ मधील नियम ३(४) मध्ये दिलेल्या खुलाशाप्रमाणे सेवा घेणारी व्यक्ती ही जेव्हा रिव्हर्स चार्जप्रमाणे सेवा घेणारी म्हणून सेवाकर भरण्यास जबाबदार असली तरीही अशा सेवाकराचा भरणा करण्यासाठी त्यांच्याजवळील सेनव्हॅट क्रेडिट शिलकीचा वापर करू शकत नाही. म्हणजेच सेवा घेणाऱ्याला अशी सेवाकराची रक्कम ही जीएआर-७ चलनाद्वारेच सरकारी तिजोरीत जमा करावी लागेल.

हा रिव्हर्स चार्ज अस्तित्वात आल्यानंतर ह्या अनुषंगाने पॉईंट ऑफ टॅक्सेशन नियमावली २०११ मध्ये देखील काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले.

ह्या नियमावलीतील नियम प्रमाणे ज्यावेळी सेवा घेणारी व्यक्ती ही फायनान्स ॲक्ट, १९९४ च्या कलम ६८(२) प्रमाणे सेवाकर भरण्यास जबाबदार असते त्यावेळी अशा व्यक्तीने अशा सेवेसाठी मिळालेल्या बिलाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत सेवा पुरविणाऱ्यास बिलाची रक्कम दिली पाहिजे व सेवाकराची रक्कम सरकारी तिजोरीत भरली पाहिजे. तसे न झाल्यास त्याला मिळालेली ही सहा महिन्याची सूट रद्द होईल व बिलाची तारीख सेवाकराच्या भरण्याकरता ग्राह्य धरुन त्याप्रमाणे व्याज भरावे लागेल.

आतापर्यंत सेवा कराचा भरणा ही केवळ सेवा पुरवणाऱ्यांची जबाबदारी व काळजी होती परंतु १ जुलै २०१२ पासून मात्र हा सेवा घेणाऱ्यांच्याही जबाबदारीचा आणि काळजीचा विषय झाला आहे हे निश्चितच.

❖❖❖

# २०१४ साली काय ?

२०१३सालाच्या सरत्या वादळी वर्षात सेवाकर स्वयंनिर्धारण योजना (व्हीसीइएस), २०१३ ने जवळजवळ मागील ६ वर्षाचा बुडीत खात्यातील कर सरकारी तिजोरीत आणण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्पीय २०१३-१४निवेदनात म्हटल्याप्रमाणे जवळजवळ दहा लाख कर बुडवे आणि जवळजवळ १ लाख कोटी सेवाकर ह्या योजनेतून सरकारपर्यंत पोहोचणे अपेक्षित होते.

३१ डिसेंबर, २०१३ रोजी ह्या योजनेची मुदत संपणार होती आणि ती तशी संपलीही मात्र वरील दोन्ही उद्दिष्टे पूर्ण करता येऊ शकली नाहीत. ह्याचे मुख्य कारण म्हणजे सर्वसामान्य जनतेचा सरकारी कामकाज आणि यंत्रणा ह्यावर वाढत चाललेला अविश्वास.

उपलब्ध आकडेवारी जाहीर झाली नसल्यामुळे त्याच्या यशापयशाबद्दल बोलणे आत्ता उचित होणार नाही. मात्र वेगवेगळ्या प्रसार माध्यमांनी दिलेल्या माहितीनूसार, आणि वेगवेगळ्या आयुक्तालयातील ढोबळ माहितीनूसार केवळ ४०% यश ह्या योजनेला मिळू शकले.

सदर योजनेला मुदतवाढ मिळेल अशी शक्यता वाटत होती व त्याविषयी सगळीकडे बोलबालाही झाला होता मात्र सरकारने ह्या योजनेचा गाशा गुंडाळला. ह्याचे मुख्य कारण दोन विभागात देता येऊ शकेल

(१) राजकीय स्वरुपात

(२) अर्थसंकल्पीय स्वरुपात.



थोडक्यात २०१४ साली होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुका होणार हे गृहीत धरुन आचारसंहिता त्या आधी लागू होते त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प हा अंतरिम अर्थसंकल्प ठरण्याची शक्यता आहे.

सरकारी यंत्रणेवर दिवसागणिक वाढत जाणारा अतिरिक्त बोजामुळे दैनंदिन कामकाजाचे तास वाढतात. पर्यायाने सूट आणि सवलत ह्या नावाखाली कर भरणाऱ्याची मानसिकताही नकारात्मक होते आणि अशावेळी प्रामाणिक करदायित्व निभावणारे अशा योजनांमुळे आपसूक अप्रामाणिक बनण्याची शक्यता निर्माण होते. खरंतर ह्याला जबाबदार कोण? सरकारी अधिकाऱ्यांचा अंकुश, सरकारात असलेल्या उच्चपदस्थ मंत्री/अधिकारी ह्यांची वक्तव्ये अथवा बेजबाबदार विधाने, वेळोवेळी बदलणाऱ्या कायद्यातील तरतूदी की मुळातच कायद्याची किचकट भाषा? खरंतर ह्या सर्व गोष्टींचा एकत्रित मिलाफ ह्याला कारणीभूत आहे असे म्हणावे लागेल

**आता पुढे काय?**

जानेवारी २०१४ पासून मागील आर्थिक वर्षात १ लाख रुपयापेक्षा जास्त सेवाकर भरणाऱ्या करदात्यांना ई-पेमेंट सक्तीचे केले आहे. अर्धा फ़ेब्रुवारी सरला, अजूनही २८ फ़ेब्रुवारीला अर्थसंकल्प होणार की नाही हे गुलदस्त्यातच आहे. २०१४-१५ला सेवाकराचे करनियोजन कसे असेल ह्याविषयी जरी अर्थसंकल्प जरी २८ फेब्रुवारीला जाहीर झाला तरी काही खास होईल किंवा ठोस होईल अशी शक्यता खूप धूसर आहे

एकतर निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार आचार संहिता २८ फ़ेब्रुवारी पूर्वीच लागू होईल आणि तसे झाल्यास अंतरिम अर्थसंकल्प एवढेच ह्याचे स्वरुप राहील आणि जेव्हा जुलै मध्ये निवडणूक पश्च्यात सरकार बनेल तेव्हा २०१४-१५ चा अर्थसंकल्प जाहीर होईल. आम्ही ह्याकडे सकारात्मक बघतो आणि म्हणूनच २०१४-१५ हे वर्ष आधीची अप्रत्यक्ष कर करप्रणाली आणि नंतरची होणारी अप्रत्यक्ष कर करप्रणाली ह्याचा दुवा म्हणून काम करेल. ज्याला आपण इंग्रजीत न्युट्रल फेज असे म्हणतो.

'हँडबुक ऑन सेंट्रल एक्साइज एण्ड सर्व्हिस टॅक्स' आणि 'तुमचा सेवाकर मार्गदर्शक' ही दोन इंग्रजी आणि मराठी पुस्तके आम्ही जुलै २०१४मध्ये प्रकाशित करत आहोत सदर पुस्तकात (इंग्रजी) अथ पासून इतिपर्यंत सेंट्रल एक्साइज आणि सेवा करातील माहिती सर्व निकषांवर उतरवून दिलेली आहे ज्याचा उपयोग सीए,सीएस,एमबीए,डिटीएल करणाऱ्या विद्यार्थ्यांना संदर्भ पुस्तक म्हणून तसेच उत्पादक, कारखानदार, सेवा पुरविणारे व्यावसायिक आणि नोकरदार मंडळी ह्यांना ह्या विषयातील सर्वकष माहिती मिळू शकेल आणि मराठीसाठी सर्वसामान्य वाचकांना सेवाकराविषयी सखोल माहिती आणि सेवा व्यावसायिकांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शक म्हणून ह्या पुस्तिकेचा उपयोग होईल, प्रकाशनपुर्व सवलतीचा लाभ वाचकांना घेता येईल.

**- ॲड. विद्याधर आपटे**
exciseadvocate@gmail.com
Mobile : 9422015835